# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः02.06.2025** **वारःसोमवार**

आकाशवाणी, राजेंद्र लेले आपल्याला बातम्या देत आहे...

आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक संघटनेच्या ऐतिहासिक सर्वसाधारण सभेला पंतप्रधान आज संबोधित करणार
वस्तू आणि सेवा कर संकलनानं सलग दुसऱ्या महिन्यात 2 लाख कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला
युक्रेनद्वारे पाच रशियन हवाई तळांवर मोठ्या प्रमाणात ड्रोन हल्ले
आयपीएल विजेतेपदासाठी किंग्ज इलेव्हन पंजाब आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात उद्या अहमदाबाद इथं लढत
आणि
ईशान्य राज्यांमध्ये मुसळधार पाऊस, मणिपूरमध्ये, प्रमुख नद्यांचे काठ फुटून बहुतांश गावं जलमय

**मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीतील भारत मंडपम इथे IATA अर्थात आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक संघटनेच्या 81 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सहभागी होणार आहेत. यावेळी मोदी उपस्थितांना संबोधितही करतील. कालपासून सुरू झालेला IATA कार्यक्रम उद्या संपेल. या कार्यक्रमादरम्यान, जगभरातील नेते भारताच्या विमान वाहतूक क्षेत्रात झालेल्या उल्लेखनीय परिवर्तनाचे आणि देशाच्या सामाजिक-आर्थिक विकासात त्याच्या योगदानाचे साक्षीदार होतील असं पंतप्रधान कार्यालयाने दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे. IATA ची शेवटची वार्षिक सर्वसाधारण सभा 42 वर्षांपूर्वी 1983 मध्ये झाली होती.

**कृषीमंत्री**

शेती ही देशाच्या अर्थव्यवस्थेची सर्वात मोठी ताकद आहे असं कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथे पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या अविभाज्य मानवतावाद संकल्पनेवरील व्याख्यानांवर आधारित 60 व्या राष्ट्रीय चर्चासत्राला संबोधित करताना चौहान यांनी ग्रामीण भागातील गरिबीमध्ये झालेली घट आणि देशातील लोकांच्या राहणीमानात झालेल्या सकारात्मक बदलांवर प्रकाश टाकला. लखपती दीदी योजना ही महिला सक्षमीकरणासाठी राबवलेली एक ठळक मोहीम असल्याचं चौहान यांनी यावेळी सांगितलं.

**केव्हीके कारगिल-विक्षित कृषी अभियान**

जम्मू आणि काश्मीरमध्ये करगिल इथल्या कृषी विज्ञान केंद्रानं कृषी आणि संबंधित विभागांच्या सहकार्यानं विकसित कृषी संकल्प अभियानांतर्गत सलग तिसऱ्या दिवशी प्रचार सुरू ठेवला आहे. विकसित भारत 2047

मोहिमेचा भाग म्हणून शाश्वत कृषी पद्धतींना प्रोत्साहन देणं आणि शेतकऱ्यांच्या कल्याणाची खात्री करण्याचा याचा उद्देश आहे. करगिलमधील शेतकऱ्यांनी या अभियानात उत्साहानं सहभाग घेतला. अनेक गावांमध्ये जागरूकता कार्यक्रमांच्या रुपात संवादात्मक सत्रं आणि प्रात्यक्षिकं आयोजित केली होती. शेती तज्ज्ञांनी शेतकऱ्यांच्या शंकांचं निरसन केलं आणि त्यांना उपयुक्त कृषी सल्ले दिले.

**<u>जीएसटी</u>**

मे महिन्यात भारताच्या जीएसटी महणजेच एकूण वस्तू आणि सेवा कर संकलनाने सलग दुसऱ्या महिन्यात 2 लाख कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला. केंद्रीय अर्थ मंत्रालयाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, मे महिन्यातएकूण जीएसटी संकलन 2 लाख 1 हजार कोटी रुपये झालं. मे 2024 मध्ये गोळा झालेल्या 1 लाख 72 हजार कोटी रुपयांच्या तुलनेत हे संकलन 16.4 दशांश टक्क्यांनी जास्त आहे. एप्रिल 2025 मध्ये, भारताच्या जीएसटी संकलनात 12.6 दशांश टक्क्यांची वाढ होऊन 2 लाख 37 हजार कोटी रुपये असा उच्चांक गाठला आहे.

**<u>लडाख-सायकल रॅली</u>**

लडाखमध्ये, युवा सेवा आणि क्रीडा विभागानं काल खेलो इंडिया योजनेच्या फिट इंडिया चळवळीअंतर्गत जागतिक सायकल दिनानिमित्त "तिरंगा यात्रा" सायकल फेरीचं आयोजन केलं. विविध शाळांमधील सायकलस्वार विद्यार्थी, आणि तरुणांनी मोठ्या संख्येनं या कार्यक्रमात उत्साहानं भाग घेतला आणि देशभक्तीची भावना दाखवली. तरुणांनी चांगलं आरोग्य आणि स्वच्छ वातावरणासाठी नियमितपणे सायकल चालविण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्यात आलं. फिट इंडिया चळवळीच्या उद्दिष्टांशी सुसंगत, तंदुरुस्ती, पर्यावरणीय शाश्वतता आणि राष्ट्रीय अभिमानाबद्दल जागरूकता पसरवणं असे या कार्यक्रमाचे विविध उद्देश आहेत.

**<u>भारतदौरा</u>**

पॅराग्वेचे राष्ट्रपती सँटियागो पेना पॅलासिओस आजपासून तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर येणार आहेत.त्यांच्यासोबत मंत्री, वरिष्ठअधिकारी आणि व्यावसायिक प्रतिनिधींसह एक उच्चस्तरीय शिष्टमंडळ असेल. राष्ट्रपतीपेना आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा करतील यात दोन्ही नेते द्विपक्षीयसंबंधांचा सर्वसमावेशक आढावा घेतील. ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणिपरराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांचीही भेट गहणार आहेत.

**<u>युक्रेन ड्रोन हल्ला</u>**

युक्रेनने काल मुर्मन्स्क, इर्कुत्स्क, इव्हानोवो, रियाझान आणि अमूर प्रदेशातील पाच रशियन हवाई तळांना लक्ष्य करून मोठ्या प्रमाणात ड्रोन हल्ले सुरू केले. रशियन संरक्षण मंत्रालयानं हल्ल्यांची पुष्टी केली असून अनेक विमानांना आग लागली, परंतु कोणतीही जीवितहानी झाली नाही असं म्हटलं आहे. युक्रेनचा हल्ला 'दहशतवादी हल्ला' असल्याचं सांगून रशियानं हे ड्रोन हल्ले परतवून लावल्याचा दावा केला. दुसरीकडे रशियाची 40 विमानं नष्ट केल्याचा दावा युक्रेननं केला.

**<u>कैलासमानसरोवर</u>**

सिक्कीम सरकार सलग पाच वर्षांच्या विश्रांतीनंतर, भगवान शिवाचं निवासस्थान मानण्यात आलेल्या पवित्र अशा कैलास मानसरोवर तीर्थयात्रेच्या आयोजनासाठी सज्ज झालं आहे. या महिन्याच्या 15 तारखेला गंगटोकमध्ये यात्रेकरूंच्या पहिल्या तुकडीचं आगमन होईल आणि यात्रेचा प्रारंभ होईल.

**तेलंगण**

तेलंगणचा आज स्थापना दिवस आहे. 2014 मध्ये आजच्याच दिवशी, आंध्र प्रदेश पुनर्रचना कायद्यानुसार तेलंगण हे देशातलं 29 वं राज्य बनलं. यानिमित्तानं तेलंगण राज्यातील सर्व सरकारी कार्यालयांमध्ये राष्ट्रध्वज फडकवण्यात येईल.

**बुद्धिबळ**

स्टॅव्हॅन्जर सिटी इथं काल रात्री झालेल्या नॉर्वे बुद्धिबळ 2025 स्पर्धेच्या सहाव्या फेरीत विद्यमान विश्वविजेता डी. गुकेशनं जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेल्या मॅग्नस कार्लसनचा पराभव केला. गुकेशचा कार्लसनवरचा हा पहिलाच शास्त्रशुद्ध विजय आहे. पांढरी प्यादी घेऊन खेळणाऱ्या भारताच्या किशोरवयीन गुकेशने दबावाखाली मात्र खंबीरपणे खेळी करत शेवटच्या गेममध्ये 34 वर्षीय नॉर्वेच्या ग्रँडमास्टरच्या एका चुकीचा फायदा घेत संस्मरणीय अशा विजयात त्याचं रूपांतर केलं.

**आशियाई ॲपथलेटिक्स चॅम्पियनशिप**

दक्षिण कोरियातील गुमी इथं पार पडलेल्या सव्विसाव्या आशियाई ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धांमध्ये, भारतीय खेळाडूंनी दमदार कामगिरी केली आणि पदक क्रमवारीत चीननंतर दुसरं स्थान मिळवलं. 8 सुवर्ण, 10 रौप्य आणि 6 कास्य अशा एकंदर 24 पदकांसह आशियाई ॲथलेटिक्समध्ये आपली वाढती प्रतिष्ठा पुन्हा एकदा सिद्ध केली. लष्कराचा खेळाडू गुलवीर सिंग यानं एकाच स्पर्धेत दोन सुवर्णपदकं जिंकून विक्रम केला. दहा हजार आणि पाच हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेत ही कामगिरी करणारा तो पहिला भारतीय खेळाडू ठरला.

**प्रो कब्बडी लीग लिलाव**

प्रो कबड्डी लीगच्या नव्या हंगामासाठी, 31 मे आणि 1 जूनला मुंबईत झालेल्या दोन दिवसांच्या लिलावांमधून तयार झालेले संघ सज्ज झाले आहेत. गेल्या हंगामात हरियाणा स्टीलर्सना विजेतेपद जिंकण्यास मदत करणारा मोहम्मद रजा शादलोई यावर सर्वाधिक बोली लागली आणि यावेळी गुजरात जायंट्समध्ये गेला. दरम्यान, देवांक दलालला भारतीय खेळाडू म्हणून सर्वात मोठी बोली लागली. सहभागी संघांमध्ये बंगाल वॉरियर्स, बेंगळुरू बुल्स, दबंग दिल्ली के.सी., गुजरात जायंट्स, हरियाणा स्टीलर्स, जयपूर पिंक पँथर्स, पटना पायरेट्स, पुणेरी पलटन, तमिळ थलैवाज, तेलुगू टायटन्स, यू मुंबा, यूपी योद्धा यांचा समावेश आहे.

**आयपीएल-क्रिकेट**

यंदाच्या आय पी एल मध्ये नवा विजेता मिळणार असल्याचं निश्चित झालं आहे. काल झालेल्या क्वालिफायर टू सामन्यात किंग्ज इलेव्हन पंजाब संघाने मुंबई इंडियन्स संघाचा 5 गडी राखून पराभव करत अंतिम फेरी गाठली आहे. मुंबईने दिलेलं 203 धावांचं आव्हान पंजाबने कर्णधार श्रेयस अय्यरच्या नाबाद 87 धावांच्या जोरावर एक षटक

राखून सहज पार केलं. आता विजेतेपदासाठी किंग्ज इलेव्हन पंजाब आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात उद्या अहमदाबाद इथं लढत होणार आहे.

**<u>ईशान्य पाऊस</u>**

ईशान्येकडील राज्यांमध्ये कालही मुसळधार पाऊस सुरूच राहिला, त्यामुळे रस्ते वाहतूक आणि रेल्वे सेवा विस्कळीत झाल्या. मुसळधार पावसानं किमान 27 जणांचा बळी घेतला आहे. अधिक पाऊस पडण्याची शक्यता असल्यानं अधिकाऱ्यांनी संपूर्ण प्रदेशात इशारा जारी केला आहे.

**<u>मणिपूर-पाऊस</u>**

मणिपूरमध्ये, राज्याला अचानक आलेल्या पुराचा तडाखा बसला आहे. प्रमुख नद्यांचे काठ फुटून बहुतांश गावं पाण्याखाली गेली आहेत. राज्य सरकार विविध ठिकाणी आपत्ती निवारण दल आणि सैन्याच्या सहकार्यानं पुनर्वसन आणि बचाव कार्य हाती घेत आहेत. पुरामुळे निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीचा विचार करून लोक प्रतिनिधींनी स्वयंसेवी संस्थांच्या मदतीनं बचाव कार्य आणि पुनर्वसन कार्यक्रम देखील सुरू केले आहेत. नागालँडमधील फिसेस्मा इथं झालेल्या भूस्खलनामुळं इम्फाळ दिमापूर रस्ता बंद झाला आहे. इतर राष्ट्रीय आणि राज्य महामार्गांवर दरडी आणि चिखल पसरला आहे. इम्फाळमध्ये, बहुतांश प्रमुख नद्यांची पाण्याची पातळी धोक्याच्या पातळीपेक्षा अधिक आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**